Prerna Education Society,

# ShreePandharinath Art's & Commerce College,

## Narkhed. Dist.-Nagpur

# Department of Economics

## Annual Report

**अर्थशास्त्र विभाग**

**(सत्र: 2023-24)**

श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक-19/10/23 ला अर्थशास्त्र विभागात अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन व अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत जंवजाळ सर हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक श्री. प्रा. सागर तवर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, नागपूर) सरांनी अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करून अर्थशास्त्राचे आर्थिक जीवनात महत्त्वाचे स्थान काय आहे? यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी जीवन जगत असताना विद्यार्थ्याला आर्थिक गोष्टीचे महत्त्व समजून घेणे सगळ्यात महत्त्वाचे असते. ज्याने आर्थिकतेचा अभ्यास केला तो जीवनात केव्हाच मागे येणार नाही असे त्यांनी समजून सांगितले. याचा विद्यार्थ्याला नक्कीच फायदा झालेला आहे.




तर दुसऱ्या सत्रात त्यांनी कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करीत असताना विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना आर्थिक साक्षरतेचे महत्व आणि आपल्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरतेमुळे होणारे बदल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थीना बचत व गुंतवणुकीचे महत्त्व समजावून सांगितले. श्रीमंत होण्याचे स्वप्न तर प्रत्येक व्यक्तीच बघत असतात परंतु श्रीमंत बनण्यासाठी कोणत्या वर्तणुकी व गुंतवणुकीची आवश्यकता आहे हेही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयंत जवंजाळ सर यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाकरिता शुभेच्छा पर मार्गदर्शन दिले.



कार्यक्रमासाठी उपस्थित वक्त्यांचे परिचय वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुधीर नारनवरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते यांनी केले. यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आर्थिक साक्षरता कशी महत्त्वाची आहे व त्यामुळे गुंतवणुकीतील धोके आपण कसे टाळू शकतो हे पटवून दिल. तसेच वर्तमान काळामध्ये शेअर मार्केट, म्युच्युअल फंड




व एसआयपी यातील गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरू शकते असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभाग -3 ची विद्यार्थिनी कु. सृष्टी शिरसागर हिने केले. तर आभार प्रदर्शन प्रा. अशोक मदनकर यांनी केले. वाणिज्य विभाग व अर्थशास्त्र विभागातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.





अर्थशास्त्र विभागात द्वारे भारतीय अंदाजपत्रक 2024 या विषयावर पोस्टर प्रदर्शनी दिनांक- 09/02/2024 ला आयोजित करण्यात आली. अंतरीम अंदाजपत्रक 2024 या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय अंदाजपत्रक 2024 मध्ये रेल्वे, कृषी, उद्योग आयकर, व्यवसायकर, शिक्षण, कृषी व स्वास्थ, आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, लघुउद्योग, मनरेगा योजना, आयुष्यमान भारत, पीएलआय योजना, सौर ऊर्जा, राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन आणि लखपती दीदी इत्यादी योजनांची माहिती तसेच विविध क्षेत्रात करण्यात आलेली आर्थिक तरतूद यातून देशाला होणारा फायदा इत्यादींचा भिंती पत्रकाच्या माध्यमातून माहिती साकारली. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे काय? ते कसे असते? त्याचा आपल्या जीवनावर काय परिणाम होतो, याची माहिती देण्यात आली.




संपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन बी.कॉम. भाग-1च्या विद्यार्थ्यांनी केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन माजी प्राध्यापक व प्रेरणा शिक्षण संस्थेचे सदस्य वरिष्ठ प्रा. श्री. शरद मेंघळ सर यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भिंती पत्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ. सुधाकर पवार, प्रा.डॉ. अनिल गणवीर, प्रा. सतीश चंदेल, प्रा. कु. रश्मी गेडाम, प्रा. दिलीप दातीर, प्रा. अशोक मदनकर, प्रा. आशिष आखरे, श्रीमती आशा खडसे, विवेक बालपंडे, गणेश उईके, मनोज गायधने,

# Photograph of Programme














# Paper News of Programme

**लोकमत**

## पंढरीनाथ महाविद्यालयात आर्थिक साक्षरतेवर कार्यशाळा




**नरखेड :** येथील श्री पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने 'इम्पॉर्टन्स ऑफ फायनान्शिअल मार्केट अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' या विषयावर कार्यशाळा पार पडली. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बॉम्बे स्टॉक मार्केट व सेबीचे प्रवर्तक प्रा. सागर तवर उपस्थित होते. त्यांनी जीवन जगताना आर्थिक साक्षरतेचे महत्त्व आणि त्यांच्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरतेमुळे होणारे बदल यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जयंत जवंजाळ होते. प्रा. डॉ. सुधीर नारनवरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. रवी सोरते यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक साक्षरता कशी महत्त्वाची आहे व त्यामुळे गुंतवणुकीतील धोके आपण कसे टाळू शकतो, हे पटवून दिले. वर्तमानकाळात शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व एसआयपी यातील गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरू शकते, असेही त्यांनी सांगितले. संचालन सृष्टी क्षीरसागर हिने केले, तर आभार प्रा. अशोक मदनकर यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. सुधाकर पवार, प्रा. डॉ. अनिल गणवीर, प्रा. सतीश चंदेल, प्रा. डॉ. श्वेता बाजपेयी, प्रा. रश्मी गेडाम, प्रा. दीक्षा मदनकर, प्रा. माधुरी नांदेकर, प्रा. शिरीष खोबे, प्रा. दिलीप दातीर, प्रा. अक्षय पुनवटकर, प्रा. विनोद बालकोटे, प्रा. राम फुले, प्रा. आशिष घाटोळे, प्रा. नेहा धर्मे, विवेक बलपांडे आदींनी सहकार्य केले.

Hello Nagpur Gramin
Page No. 6 Oct 22, 2023
Powered by: erelego.com

**नवराष्ट्र**

## पंढरीनाथ महाविद्यालयात अंदाजपत्रक प्रदर्शन

### अर्थशास्त्र विभागाचे आयोजन



**नरखेड,** तालुका प्रतिनिधी. पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाद्वारे भारतीय अंदाजपत्रक 2024 या विषयावर पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली.

'अंतरिम अंदाजपत्रक 2024' या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय अंदाजपत्रक 2024 मध्ये रेल्वे, कृषी, उद्योग, आयकर, व्यवसाय कर, शिक्षा कृषी व स्वास्थ, आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, लघुउद्योग, मनरेगा योजना, आयुष्मान भारत, पिएलआय योजना, सौर ऊर्जा, राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन आणि लखपती दीदी इत्यादी योजनांची माहिती तसेच विविध क्षेत्रात करण्यात आलेली आर्थिक तरतूद यातून देशाला होणारा फायदा इत्यादींचा भिंती पत्रकाच्या माध्यमातून माहिती साकारली. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना अंदाजपत्रक म्हणजे काय, ते कसे असते, त्याचा आपल्या जीवनावर काय परिणाम होतो, याची माहिती देण्यात आली.

संपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन बी.कॉम. भाग एकच्या विद्यार्थ्यांनी केले होते. प्रदर्शनीचे उद्घाटन माजी प्राध्यापक व प्रेरणा शिक्षण संस्थेचे सदस्यशरद मेंगळ यांनी केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवी सोरते यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण भिंती पत्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. विजय राऊत, प्रा. डॉ. समीर पाहुणे, प्रा. डॉ.सुधाकर पवार, प्रा. डॉ. श्वेता वाजपेयी, प्रा. पवन महंत, प्रा. डॉ. अनिल गणवीर, प्रा. ग्रंथपाल सतीश चंदेल, प्रा. अशोक मदनकर,प्रा. आशिष आखरे, प्रा. कु.रश्मी गेडाम, गणेश उईके, राहुल धुर्वे व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

Orange City Plus Edition
10 February 2024 Page No. 5
epaper.navarashtra.com